# सीएसएमटी ते सहार रोड भुयार पूर्ण

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई मेट्रो-३ मार्गिकेच्या पॅकेज ६ मधील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ टी २ ते सहार रोड दरम्यान ६९२ मीटरचे भुयार तब्बल १६० दिवसांमध्ये पूर्ण करण्यात आलेले आहे. १५० निष्णात अभियंते आणि कामगारांच्या अथक परिश्रमाने हे भुयार यशस्वीपणे पूर्ण करण्यात मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनला (एमएमआरसी) यश मिळाले आहे.

तापी-१ या टीबीएम मशीनने १३ सप्टेंबर २०१८ रोजी छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळापासून ते सहार रोडपर्यंतच्या भुयारीकरणाला प्रारंभ केला होता. ८९ मीटर इतके लांब तापी-१ या टराटेक कंपनीच्या टीबीएमद्वारे प्रतिदिन ४.३१ मीटर इतक्या वेगाने भुयारीकरण करते. भुयारीकरणाप्रमाणेच सहार स्थानकाच्या बांधणीचे काम सर्वात महत्त्वाचे आहे. कारण मुंबईची सर्वात जुनी आणि तितकीच महत्त्वाची जलवाहिनी तानसाला न हलवता त्याच्या खालून सहार मेट्रो स्थानकाच्या बांधणीचे काम करण्यात येत आहे. ब्रेशिया आणि बेसाल्ट यांसारख्या टणक खडकांना भेदत तापी-१ ने ४९५ आरसीसी सिमेंट रिंग्सचा वापर करत भुयार तयार केले आहे.



एमएमआरसीच्या पूर्ण प्रकल्पातील ५२ किमी भुयारीकरणापैकी २० किमीपेक्षा जास्त भुयारीकरण पूर्ण झाले असून एकूण १७ टीबीएम मशीन दहा लाँचिंग शाफ्टमधून कार्यरत करण्यात आले आहेत. एमएमआरसीच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे म्हणाल्या की, मुंबई मेट्रो-३ च्या संपूर्ण प्रकल्पात सहार मेट्रो स्थानकाची बांधणी सर्वात महत्त्वपूर्ण आणि तितकीच आव्हानात्मक आहे, कारण मुंबईची सर्वात महत्त्वाची जलवाहिनी तानसाला संपूर्णपणे सुरक्षित ठेऊन त्याखालून सहार मेट्रो स्थानकाच्या बांधणीचे काम यशस्वीपणे पार पाडण्यात आमच्या अभियंत्यांना यश प्राप्त झाले आहे, त्यांचे मनापासून अभिनंदन, असे त्या यावेळी म्हणाल्या.